| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२१३१/२०१५ |
| सरकार -वि- दिपा वगैरे |
| निशाणी क्र.२९ |

## <u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची शपथेवर सरतपासणी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | भवेंद्र रामसिंग नामदेव |
| **वय** | : | ३० वर्ष |
| **धंदा** | : | बस कंडक्टर |
| **राहणार** | : | हैदराबाद |

**<u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. संजयकुमार गाडगे यांचेमार्फत</u>**

मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखत नाही. दिनांक २१.०५.२०१५ रोजी पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. साक्षीदाराच्या **सहीला निशाणी क्र.३०** देण्यात येते.

**<u>सरकारी अभियोक्तांच्या विनंतीवरुन साक्षीदार पूर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने उलट तपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली. उलटतपास सरकारी अभियोक्तांतर्फे</u>**

२. दिनांक २१.०५.२०१५ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी मुन्नीबाई काडफोडचे बिल्डींगमध्ये बोलावले होते, हे म्हणणे खरे नाही. तिथे आरोपी क्र.१ ला बोलावले होते, हे म्हणणे खरे नाही. त्या बिल्डींगमध्ये एक खोली होती व त्या खोलीमध्ये एक लोखंडी पलंग, गादी, बेडशिट व तकीया ठेवले होते, हे म्हणणे खरे नाही. खोलीतील वस्तुस्थितीचा पंचनामा केला, हे म्हणणे खरे नाही. पंचनाम्यातील मजकूर मला वाचून

दाखवला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली, हे म्हणणे खरे नाही. मी कोणत्याही कागदावर मजकूर वाचल्याशिवाय सही करीत नाही, हे म्हणणे खरे आहे. घटनास्थळ पंचनामा वाचून पाहील्यावर मी सही केली, हे म्हणणे खरे नाही. आरोपींना वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

**उलट तपास आरोपींतर्फे अधिवक्ता श्री. ए. थॉमस यांचेमार्फत**

नाकारला.

**फेरतपास – नाही**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(यु.पी. कुलकर्णी)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक २०.०१.२०२४